भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६

( १९५६ चा अधिनियम क्रमांक १०४ )

[१ जुलै, १९८० रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Suppression of Immoral Traffic in Women and Girls Act, 1956

(Act No. 104 of 1956)

**[As in force on the 1st July, 1980]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले

१९८१

[किंमत रु. १.७०]

## विशोधन अधिनियमांची सूची

१. १९७८ चा अधिनियम क्रमांक ४६.

# स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६

## अनुक्रमणिका

कलमे — कलमांचा क्रम


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

२क. जम्मू व काश्मीरला लागू न होणाऱ्या अधिनियमितीसंबंधी अर्थ लावण्याबाबतचा नियम.

३. वेश्यागृह चालविणे किंवा वेश्यागृह म्हणून जागेचा वापर करून देणे याबद्दल शिक्षा.

४. वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उदरनिर्वाह करण्याबद्दल शिक्षा.

५. वेश्याव्यवसायासाठी एखादी स्त्री मिळवून देणे, त्यासाठी तिला प्रवृत्त करणे किंवा घेऊन जाणे.

६. जेथे वेश्याव्यवसाय चालतो अशा वास्तूमध्ये एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला अडकवून ठेवणे.

७. सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या आसपास वेश्याव्यवसाय करणे.

८. वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनासाठी फूस लावणे किंवा मिन्नतवारी करणे.

९. अभिरक्षेत असलेल्या स्त्रीला किंवा मुलीला फूस लावणे.

१०. चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून किंवा योग्य ती समज देऊन सोडून देणे.

१०क. सुधारसंस्थेत अडकवून ठेवणे.

११. पूर्वी दोषी ठरविलेल्या अपराध्यांचा पत्ता कळवणे.

१२. सराईत गुन्हेगारांच्या सद्‌वर्तनाबद्दल जामीन.

१३. विशेष पोलीस अधिकारी व सल्लागार मंडळ.

१४. अपराध दखलपात्र असणे.

१५. वॉरंटाशिवाय झडती.

१६. स्त्रीला किंवा मुलीला संकटमुक्त करणे.

१७. कलम १५ अन्वये हलवण्यात आलेल्या किंवा कलम १६ अन्वये संकटमुक्त करण्यात आलेल्या स्त्रियांची व मुलींची मधल्या काळातील अभिरक्षा.

१८. वेश्यागृह बंद करणे आणि त्या जागेतून अपराध्यांना काढून लावणे.

१९. सुरक्षागृहात ठेवले जाण्यासाठी किंवा न्यायालयाकडून देखभाल केली जाण्यासाठी व संरक्षण मिळण्यासाठी अर्ज.

२०. वेश्येला कोणत्याही जागेतून हलवणे.

२१. सुरक्षागृहे.

२२. संपरीक्षा.

२२क. विशेष न्यायालये स्थापन करण्याची शक्ती.

२२ख. प्रकरणाची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची न्यायालयाची शक्ती.

२३. नियम करण्याची शक्ती.

२४. हा अधिनियम इतर विवक्षित अधिनियमांना न्यूनकारी नसणे.

२५. निरसन व व्यावृत्ती.

अनसूची.

# स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६

## (१९५६ चा अधिनियम क्रमांक १०४)

[३० डिसेंबर, १९५६]

स्त्रिया व मुली यांच्या अपव्यापारास आळा घालण्यासाठी, ९ मे, १९५० रोजी न्यूयॉर्क येथे करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय कराराच्या अनुषंगाने उपबंध करण्याकरता अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :--

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास 'स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल ; आणि या अधिनियमाचे उर्वरित उपबंध केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येतील.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,--

(क्) "वेश्यागृह" यामध्ये ज्याचा उपयोग दुसऱ्या व्यक्तीच्या फायद्याच्या किंवा दोन अथवा अधिक वेश्यांच्या आपसातील लाभाच्या दृष्टीने वेश्याव्यवसाय करण्यासाठी करण्यात येतो असे कोणतेही घर, खोली, [१] [वाहन] किंवा जागा किंवा कोणत्याही घराचा, खोलीचा, [१] [वाहनाचा] किंवा जागेचा असा कोणताही भाग समाविष्ट आहे ;

[१] [(कक्) "सुधारसंस्था" याचा अर्थ, ज्यांना सुधारणे आवश्यक आहे अशा स्त्रिया व मुली यांना या अधिनियमान्वये जेथे अडकवून ठेवता येईल अशी (कलम २१ अन्वये तशी संस्था म्हणून स्थापन करण्यात आलेली किंवा लायसन देण्यात आलेली), कोणत्याही नावाने ओळखली जाणारी संस्था असा आहे, व त्यामध्ये, जेथे संपरीक्षाधीन स्त्रियांना या अधिनियमास अनुसरून ठेवता येईल अशा आश्रयस्थानाचा समावेश होतो ; ]

(ख्) "मुलगी" याचा अर्थ, जिच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण झालेली नाहीत ती स्त्री असा आहे ;

[२] [(ग्) "दंडाधिकारी" याचा अर्थ, ज्या कलमात हा शब्दप्रयोग येतो आणि जे कलम अनुसूचीच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केले आहे त्या कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करण्यास सक्षम म्हणून अनुसूचीच्या दुसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेला दंडाधिकारी असा आहे ;

(घ्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे

[३] (*) * * * *

[४] [(च्) "वेश्याव्यवसाय" याचा अर्थ, एखाद्या स्त्रीने लैंगिक स्वैराचारासाठी आपले शरीर भाड्याने देऊ करण्यासाठी केलेली कृती असा आहे--मग ते भाडे पैशांच्या रूपात असो वा वस्तूच्या रूपात असो आणि ते तात्काळ देऊ केलेले असो किंवा अन्य प्रकारे देऊ केलेले असो--आणि "वेश्या" या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावला जाईल ;

(छ्) "सुरक्षागृह" याचा अर्थ, ज्यांची काळजी घेणे व संरक्षण करणे आवश्यक आहे अशा स्त्रिया व मुली यांना ज्या संस्थेत या अधिनियमान्वये ठेवता येईल अशी (कलम २१ अन्वये अशी संस्था म्हणून स्थापन करण्यात आलेली किंवा लायसन देण्यात आलेली), कोणत्याही नावाने ओळखली जाणारी संस्था असा आहे, मात्र यात पुढील प्रकारच्या संस्थांचा समावेश होत नाही, त्या म्हणजे,--

(एक) संपरीक्षाधीन स्त्रियांना या अधिनियमास अनुसरून जेथे ठेवता येते ते आश्रयस्थान, किंवा

(दोन) सुधारसंस्था ; ]

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम २ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता--कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता--कलम २ द्वारे खंड (ङ्) गाळला (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता--कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(ज्) "सार्वजनिक ठिकाण" याचा अर्थ, जनतेच्या उपयोगासाठी किंवा जनतेला खुली असलेली अशी कोणतीही जागा असा आहे व त्यामध्ये सार्वजनिक वाहनाचाही अंतर्भाव आहे;

(झ्) "विशेष पोलीस अधिकारी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्रात सुव्यवस्था राखण्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने किंवा त्याच्या वतीने नियुक्त केलेला पोलीस अधिकारी असा आहे;

(ञ्) "स्त्री" याचा अर्थ, जिच्या वयाला एकवीस वर्षे पूर्ण झालेली आहेत ती स्त्री असा आहे.

जम्मू व काश्मीरला लागू न होणाऱ्या अधिनियमितीसंबंधी अर्थ लावण्याबाबतचा नियम.

[1][२क. जम्मू व काश्मीर राज्यात जो कायदा अंमलात नाही त्या कायद्यासंबंधी या अधिनियमात असलेल्या कोणत्याही निर्देशाचा त्या राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात कोणताही तदनुरूप कायदा अंमलात असल्यास, त्या कायद्याचा निर्देश म्हणून लावला जाईल.]

वेश्यागृह चालविणे किंवा वेश्यागृह म्हणून जागेचा वापर करू देणे याबद्दल शिक्षा.

३. (१) जी व्यक्ती वेश्यागृह चालविते किंवा त्याची व्यवस्था पाहते किंवा ते चालविण्याचे किंवा त्याची व्यवस्था पाहण्याच्या कामाचा भाग म्हणून एखादे काम करते किंवा त्या कामास सहाय्य करते अशी कोणतीही व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा, कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य-दंडास पात्र होईल आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त पाच वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

(२) जी कोणतीही व्यक्ती,—

(क्) कोणत्याही वास्तूचा भाडेकरू, पट्टेदार, भोगवटादार किंवा हुकमतदार व्यक्ती असून अशी वास्तू किंवा तिचा कोणताही भाग वेश्यागृह म्हणून वापरील किंवा जाणूनबुजून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीस वापरू देईल, किंवा

(ख्) कोणत्याही वास्तूचा मालक, पट्टाकार किंवा भाडेमालक किंवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा किंवा भाडेमालकांचा अभिकर्ता असून ती वास्तू किंवा तिचा कोणताही भाग वेश्यागृह म्हणून वापरला जाण्याचा इरादा आहे हे माहीत असूनही ती वास्तू किंवा तिचा कोणताही भाग भाड्याने देईल किंवा अशी वास्तू किंवा तिचा कोणताही भाग यांचा वेश्यागृह म्हणून वापर करण्यात जाणूनबुजून सामील होईल, ती व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच द्रव्यदंडास पात्र होईल.

(३) त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (२) च्या खंड (एक) किंवा खंड (ख्) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती ही एखादी वास्तू किंवा तिचा कोणताही भाग यांच्या संबंधात त्या पोटकलमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल दोषी ठरल्यास असा अपराध घडला त्यावेळी अशी वास्तू ज्या 'भाडेपट्ट्याच्या किंवा कराराच्या' अन्वये भाड्याने देण्यात आलेली असेल किंवा धारण केलेली असेल किंवा भोगवट्याखाली असेल तो भाडेपट्टा किंवा करार उक्त दोषसिद्धीच्या दिनांकी व तेव्हापासून शून्य व अप्रवर्ती ठरेल.

वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उदर-निर्वाह करण्याबद्दल शिक्षा.

४. (१) अठरा वर्षांहून अधिक वयाची जी कोणतीही व्यक्ती जाणूनबुजून पूर्णतः अथवा अंशतः एखाद्या स्त्रीच्या किंवा मुलीच्या वेश्याव्यवसायाच्या कमाईवर उदरनिर्वाह करील ती व्यक्ती, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल, इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

[2][(२) जेव्हा अठरा वर्षांपेक्षा अधिक वयाची एखादी व्यक्ती,—

(क्) एखाद्या वेश्येसमवेत राहात असल्याचे किंवा नेहमीच तिच्या संगतीत राहात असल्याचे; किंवा

(ख्) ती एखाद्या वेश्येला तिच्या व्यवसायात मदत करत आहे किंवा अपप्रेरणा देत आहे किंवा वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडत आहे असे जेणेकरून दिसून येईल अशा रीतीने त्या वेश्येच्या हालचालींवर नियंत्रण ठेवत असल्याचे, त्यांचे सूत्रचालन करत असल्याचे किंवा त्यावर प्रभाव पाडत असल्याचे; किंवा

(ग्) एखाद्या वेश्येच्या वतीने दलाल किंवा भडवा म्हणून काम करीत असल्याचे,

सिद्ध करण्यात येईल तेव्हा त्या बाबतीत, विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तोवर असे गृहीत धरण्यात येईल की, अशी व्यक्ती पोटकलम (१) च्या अर्थानुसार दुसऱ्या व्यक्तीच्या वेश्याव्यवसायाच्या कमाईवर जाणूनबुजून निर्वाह करीत आहे.]

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम ३ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

५. (१) जी व्यक्ती,—

(क) एखादी स्त्री किंवा मुलगी तिच्या संमतीने किंवा संमतीशिवाय वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनासाठी मिळवून देईल किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील ; किंवा

वेश्याव्यवसायासाठी एखादी स्त्री मिळवून देणे, त्यासाठी तिला प्रवृत्त करणे किंवा घेऊन जाणे.

(ख) वेश्याव्यवसायासाठी एखाद्या स्त्रीने अथवा मुलीने वेश्यागृहातील रहिवासी व्हावे किंवा तिने तेथे वरचेवर येत रहावे या उद्देशाने तिला एखाद्या ठिकाणाहून निवण्यासाठी प्रवृत्त करील ; किंवा

(ग) एखाद्या स्त्रीने अथवा मुलीने वेश्याव्यवसाय करावा किंवा वेश्याव्यवसाय करण्यासाठी तिला पोसावे या उद्देशाने तिला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाईल किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न करील, किंवा कोणातरीकरवी घेऊन जाईल ; किंवा

(घ) एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला वेश्याव्यवसाय करावयास लावील किंवा प्रवृत्त करील,

अशी कोणतीही व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा, कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त दोन वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) या कलमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, ती व्यक्ती कमीत कमी दोन वर्षे व जास्तीत जास्त पाच वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(३) या कलमाखालील अपराधाची संपरीक्षा—

(क) ज्या ठिकाणाहून स्त्री किंवा मुलगी मिळवून देण्यात आली असेल किंवा जेथून निवण्यासाठी तिला प्रवृत्त केलेले असेल, तिला नेलेले असेल किंवा कोणातरीकरवी नेण्यात आलेले असेल अथवा जेथून अशा स्त्रीला किंवा मुलीला मिळवून देण्याचा किंवा घेऊन जाण्याचा प्रयत्न केलेला असेल अशा ठिकाणी ; किंवा

(ख) ती स्त्री किंवा मुलगी प्रलोभनामुळे जेथे गेलेली असेल किंवा तिला जेथे नेलेले असेल किंवा कोणातरीकरवी नेण्यात आलेले असेल किंवा तिला घेऊन जाण्याचा प्रयत्न केलेला असेल अशा ठिकाणी,

करता येईल.

६. (१) जी व्यक्ती कोणत्याही स्त्रीला किंवा मुलीला तिच्या संमतीने किंवा संमतीशिवाय,—

जेथे वेश्याव्यवसाय चालतो अशा वास्तूमध्ये एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला अडकवून ठेवणे.

(क) कुंटणखान्यात अडकवून ठेवील ; किंवा

(ख) कोणत्याही वास्तूमध्ये तिने आपल्या कायदेशीर पतीव्यतिरिक्त इतर कोणत्याही पुरुषाशी संभोग करावा या उद्देशाने तिला त्या वास्तूच्या जागेत किंवा जागेवर अडकवून ठेवील.

अशी कोणतीही व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा, कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त दोन वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) या कलमाखालील अपराधाबद्दल दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, ती व्यक्ती कमीत कमी दोन वर्षे व जास्तीत जास्त पाच वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(३) जर एखाद्या व्यक्तीने एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला वेश्यागृहामध्ये अथवा कोणत्याही वास्तूमध्ये किंवा त्या जागेवर राहण्यास भाग पाडण्याच्या किंवा प्रवृत्त करण्याच्या उद्देशाने,—

(क) तिच्या मालकीचे कोणतेही जडजवाहीर, परिधान करण्याचे कपडे, पैसे किंवा इतर मालमत्ता अडकवून ठेवली तर ; किंवा

(ख) अशा व्यक्तीने किंवा अशा व्यक्तीच्या आदेशानुसार तिला उसने दिलेले किंवा पुरविलेले कोणतेही जडजवाहीर, परिधान करावयाचे कपडे, पैसे किंवा इतर मालमत्ता ती स्त्री किंवा मुलगी आपल्या बरोबर घेऊन गेल्यास तिच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल अशी तिला धमकी दिली तर,

ती व्यक्ती अशा स्त्रीला अथवा मुलीला तिने त्या ठिकाणी तिच्या कायदेशीर पतीखेरीज इतर कोणत्याही पुरुषासमवेत संभोग करावा यासाठी अडकवून ठेवीत आहे असे गृहीत धरले जाईल.

(४) ज्या व्यक्तीने अशा स्त्रीला किंवा मुलीला अडकवून ठेवलेले असेल त्या व्यक्तीच्या सांगण्यावरून अशा स्त्रीविरुद्ध किंवा मुलीविरुद्ध जे कोणतेही जडजवाहीर, परिधान करावयाचे कपडे किंवा इतर मालमत्ता अशा स्त्रीला किंवा मुलीला अथवा तिच्यासाठी उसनी देण्यात आलेली असल्याचे किंवा पुरवण्यात आली असल्याचे अथवा अशा स्त्रीने अथवा मुलीने तारण ठेवली असल्याचे सांगण्यात आले असेल ते जडजवाहीर, परिधान करावयाचे कपडे किंवा इतर मालमत्ता परत मिळवण्यासाठी किंवा अशा स्त्रीकडून अथवा मुलीकडून येणे असल्याचे सांगण्यात आले असेल अशा कोणत्याही पैशाच्या वसुलीसाठी कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही होऊ शकणार नाही—मग कोणताही कायदा याविरुद्ध असला तरी हरकत नाही.

सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या आसपास वेश्याव्यवसाय करणे.

७. [1][ (१) (क्) पोटकलम (३) अन्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांत असलेल्या ; अथवा

(ख्) एखादे सार्वजनिक धार्मिक उपासनास्थान, शैक्षणिक संस्था, वसतिगृह, रुग्णालय, शुश्रूषालय अथवा पोलीस आयुक्त किंवा जिल्हा दंडाधिकारी यांजकडून यासंबंधात विहित पद्धतीने अधिसूचित करण्यात येईल असे कोणत्याही प्रकारचे अन्य सार्वजनिक ठिकाण यांपासून दोनशे मीटर अंतराच्या आत असेल अशा,

कोणत्याही वास्तूमध्ये वेश्याव्यवसाय करणारी कोणतीही स्त्री किंवा मुलगी आणि जिच्याबरोबर अशा रीतीने वेश्याव्यवहार करण्यात येत असेल ती व्यक्ती तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल. ]

(२) जी कोणतीही व्यक्ती,—

(क्) एखाद्या सार्वजनिक ठिकाणाचा परिरक्षक असून वेश्यांना त्यांच्या धंद्याच्या प्रयोजनासाठी जाणूनबुजून अशा ठिकाणाचा आश्रय घेऊ देईल किंवा तेथे राहू देईल ; किंवा

(ख्) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वास्तूचा भाडेकरू, पट्टेदार, भोगवटादार किंवा हुकूमतदार व्यक्ती असून जाणूनबुजून त्या वास्तूचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा वेश्याव्यवसायासाठी वापर करू देईल ; किंवा

(ग्) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वास्तूचा मालक, पट्टाकार किंवा भाडेमालक किंवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा किंवा भाडेमालकाचा अभिकर्ता असून ती वास्तू किंवा तिचा कोणताही भाग वेश्याव्यवसायासाठी वापरला जाईल हे माहीत असूनही तो भाड्याने देईल किंवा जाणूनबुजून असा वापर करण्यात सामील होईल,—

ती व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास तसेच दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

[2][ (३) राज्यातील एखाद्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये ज्या प्रकारच्या लोकांची वर्दळ असते ते लोक, त्या क्षेत्राचे स्वरूप, तेथील लोकवस्तीची दाटी आणि अन्य संबद्ध गोष्टी विचारात घेतल्यानंतर राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केले असेल त्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये वेश्याव्यवसाय चालवला जाऊ नये असा निदेश देऊ शकेल.

(४) एखाद्या क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या संबंधात पोटकलम (३) अन्वये एखादी अधिसूचना काढण्यात आली असेल त्या बाबतीत, राज्य शासन अधिसूचनेत वाजवी रीत्या अशा क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या निश्चित मर्यादा ठरवून देईल.

(५) अशी कोणतीही अधिसूचना ही, ती काढण्यात आल्याच्या दिनांकानंतरचा नव्वद दिवसांचा कालावधी संपण्याआधीच्या दिनांकापासून परिणामक होईल अशा प्रकारे काढली जाणार नाही.]

वेश्याव्यवसायाच्या प्रयोजनासाठी फूस लावणे किंवा मिन्नतवारी करणे.

८. जी कोणी व्यक्ती कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा तेथून दृष्टिपथात येईल एवढ्या टप्प्यात आणि तेथून पाहता यावे किंवा ऐकता यावे अशा प्रकारे—मग ते कोणत्याही इमारतीतून अथवा घरातून असो वा नसो—

(क्) शब्दांनी, अंगविक्षेपांनी किंवा आपल्या शरीराचे जाणूनबुजून प्रदर्शन मांडून (एखाद्या इमारतीच्या किंवा घराच्या खिडकीत किंवा सज्जात बसून किंवा अन्य एखाद्या रीतीने), किंवा अन्यथा कोणत्याही व्यक्तीस वेश्याव्यवहाराच्या प्रयोजनासाठी मोहात पाडील किंवा मोहात पाडण्याचा प्रयत्न करील, अथवा तिचे लक्ष वेधून घेईल किंवा लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करील ; किंवा

(ख्) वेश्याव्यवहारांच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीकडे मिन्नतवारी करील अथवा तिची छेड काढील अथवा ज्यामुळे अशा सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास राहणाऱ्या किंवा त्या ठिकाणाच्या जवळून येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींना अडथळा होईल किंवा त्रास होईल किंवा सार्वजनिक सभ्यतेचा भंग होईल अशा रीतीने घुटमळेल किंवा वागेल ;

ती व्यक्ती पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल आणि दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास तसेच पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ५ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

अभिरक्षेत असलेल्या स्त्रीला किंवा मुलीला फूस लावणे.

९. [1][ स्वतःकडे एखाद्या स्त्रीची किंवा मुलीची अभिरक्षा, ताबा किंवा देखरेख असताना किंवा स्वतः त्या स्त्रीवर किंवा मुलीवर हुकमत गाजवता येईल अशा स्थानी असताना ] जी कोणीही व्यक्ती त्या स्त्रीला किंवा मुलीला वेश्याव्यवसाय करण्यासाठी फूस लावण्यास कारणीभूत होईल किंवा त्या कामी साहाय्य करील किंवा त्यासाठी अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, पहिल्यांदा दोषसिद्धी होईल तेव्हा, कमीत कमी एक वर्ष व जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या सश्रम कारावासास, तसेच एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(२) या कलमाखालील अपराधाबद्दल दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर दोषसिद्धी झाल्यास, कोणतीही व्यक्ती पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, तसेच एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून किंवा योग्य ती समज देऊन सोडून देणे.

[2][ १०. (१) कलम ७ किंवा कलम ८ खालील कोणत्याही अपराधाबद्दल पहिल्यांदा दोषी ठरलेल्या व्यक्तीस, ज्या न्यायालयासमोर तिची दोषसिद्धी झाली त्या न्यायालयास तिचे वय, चारित्र्य, पूर्ववृत्त व ज्या परिस्थितीत अपराध घडला ती परिस्थिती लक्षात घेऊन,—

(क्) 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) अंमलात असलेल्या क्षेत्रात उद्भवलेल्या प्रकरणात, त्या अधिनियमाच्या कलम ४ मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने ; आणि

(ख्) अन्य कोणत्याही प्रकरणात, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) –कलम ३६० च्या पोटकलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने,

सद्वर्तनाच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून सोडून देता येईल.

(२) कलम ७ किंवा कलम ८ खालील कोणत्याही अपराधाबद्दल पहिल्यांदा दोषी ठरलेल्या व्यक्तीस देखील तिचे वय, चारित्र्य, पूर्ववृत्त आणि ज्या परिस्थितीत अपराध घडला ती परिस्थिती लक्षात घेऊन,—

(क्) 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) अंमलात असलेल्या क्षेत्रात उद्भवलेल्या प्रकरणात, त्या अधिनियमाच्या कलम ३ मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने; आणि

(ख्) अन्य कोणत्याही प्रकरणात, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) कलम ३६० च्या पोटकलम (३) मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने,

समज देऊन सोडून देता येईल.

(३) 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) याची कलमे ५ ते १७ (दोन्ही धरून) यांचे उपबंध पोटकलम (१) चा खंड (क्) आणि पोटकलम (२) चा खंड (क्) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांना लागू होतील.

(४) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २)-कलम ३६० याची पोटकलमे (२) ते (१०) यांचे उपबंध पोटकलम (१) चा खंड (ख्) आणि पोटकलम (२) चा खंड (ख्) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणांना लागू होतील.

(५) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली किंवा कलम ४, कलम ५, कलम ६ अथवा कलम ९ खाली एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवलेल्या कोणत्याही व्यक्तीस परिवीक्षाधीन ठेवून किंवा योग्य ती समज देऊन सोडून दिले जाणार नाही.

(६) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ७ किंवा कलम ८ खालील कोणत्याही अपराधाबद्दल पहिल्यांदा दोषी ठरलेली व्यक्ती जर स्त्री अथवा मुलगी असेल तर, तिच्याविरुद्ध या कलमान्वये कार्यवाही केली जाईल आणि तिला कोणतीही कारावासाची शिक्षा दिली जाणार नाही—मात्र अपराधाचे स्वरूप आणि अपराध्याचे चारित्र्य यांसुद्धा प्रकरणाची परिस्थिती विचारात घेता, त्या व्यक्तीविरुद्ध या कलमान्वये कार्यवाही करणे इष्ट होणार नाही, अशी न्यायालयाची खात्री पटली असेल तर गोष्ट अलाहिदा ; आणि जर न्यायालयाने पहिल्या दोषसिद्धीअंती अपराध्यास कारावासाची कोणतीही शिक्षा फर्मावली तर, न्यायालय त्याबद्दलची कारणे लेखी नमूद करील.

(७) न्यायालय, अशा स्त्रीवर अथवा मुलीवर या कलमान्वये कार्यवाही करणे इष्ट होईल की, नाही याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्यासाठी 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ (१९५८ चा २०)' याअन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याकडून अहवाल मागवील, आणि असा कोणताही अहवाल असल्यास तो आणि अपराध्याचे चारित्र्य व त्याची शारीरिक आणि मानसिक स्थिती यासंबंधीची अन्य कोणतीही माहिती विचारात घेईल.

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले ( २ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता — कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले ( २ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

सुधारसंस्थेत अडकवून ठेवणे.

१० क. (१) ज्या बाबतीत,---

(क) एखादी अपराधी स्त्री कलम ७ किंवा कलम ८ खालील एखाद्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असून, तिला कलम १० च्या पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये सोडून देण्यात आलेले नसेल ; आणि

(ख) अशा अपराधी स्त्रीचे चारित्र्य, प्रकृतिमान व मानसिक स्थिती आणि त्या प्रकरणाची अन्य परिस्थिती पाहता तिच्यात सुधारणा होण्यास उपकारक होईल अशा मुदतीपर्यंत तिला अडकवून ठेवणे व तशा प्रकारचे शिक्षण देणे व शिस्त लावणे समयोचित असेल,

त्या बाबतीत, न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे कारावासाच्या शिक्षेऐवजी किमान दोन व जास्तीत जास्त पाच वर्षे इतक्या मुदतीपर्यंत तिला सुधारसंस्थेत अडकवून ठेवण्यासंबंधीचा आदेश देणे कायदेशीर ठरेल :

परंतु, असा आदेश देण्यापूर्वी,---

(एक) न्यायालय अपराधी स्त्रीस आपले म्हणणे मांडण्याची संधी देईल आणि तसेच हे प्रकरण अशा संस्थेमार्फत हाताळले जाण्याच्या योग्यायोग्यतेबाबत ती जे कोणतेही अभिवेदन करील ते अभिवेदन आणि 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) याअन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याचा अहवालही विचारात घेईल ; आणि

(दोन) अपराधी स्त्रीचे चारित्र्य, प्रकृतिमान, मानसिक स्थिती आणि त्या प्रकरणातील अन्य परिस्थिती पाहता, पूर्वोक्तानुसार असे शिक्षण देणे आणि शिस्त लावणे हे त्या अपराधी स्त्रीला हितकारक ठरण्याची शक्यता आहे अशी आपली खात्री पटल्याचे न्यायालय नमूद करील.

(२) पोटकलम (३) च्या उपबंधांच्या अधीनतेने, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याचे अपील, निर्देशन आणि पुनरीक्षण यांच्यासंबंधीचे आणि 'मुदत अधिनियम, १९६३' (१९६३ चा ३६) यामध्ये अपील किती मुदतीत दाखल करावे लागेल त्यासंबंधी असलेले उपबंध हे, जणू काही पोटकलम (१) खालील अटकावणी आदेश म्हणजे ज्या कालावधीपर्यंत अडकवून ठेवण्याचा आदेश देण्यात आला असेल तितक्याच मुदतीचा तो कारावासाचा शिक्षादेश असल्याप्रमाणे त्या आदेशाला लागू होतील.

(३) यासंबंधात विहित करण्यात येईल अशा नियमांच्या अधीनतेने, अपराधी स्त्रीला सुरक्षागृहात अडकवून ठेवण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही वेळी, राज्य शासन किंवा यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेले प्राधिकरण हे, जर अशी अपराधी स्त्री एखादा उपयुक्त व उद्योगी जीवनक्रम आचरू शकेल अशी त्याची खात्री झाली तर, तिला बिनशर्त किंवा योग्य वाटतील अशा शर्तींवर अशा संस्थेतून मुक्त करू शकेल, आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात तिला एक लेखी लायसन देऊ शकेल.

(४) पोटकलम (३) खाली अपराधी स्त्रीला ज्या शर्तींवर सोडून देण्यात येईल त्या शर्तींमध्ये; अपराधी स्त्रीचा निवास व तसेच तिचे क्रियाव्यापार आणि तिच्या हालचाली यांवर देखरेख यासंबंधी आवश्यक केलेल्या गोष्टी यांचा समावेश असू शकेल.]

पूर्वी दोषी ठरविलेल्या अपराध्यांचा पत्ता कळवणे.

**११.** (१) जर एखाद्या व्यक्तीस,---

(क) या अधिनियमाखाली किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम ३६३, कलम ३६५, कलम ३६६, कलम ३६६-क, कलम ३६६-ख, कलम ३६७, कलम ३६८, कलम ३७०, कलम ३७१, कलम ३७२ अथवा कलम ३७३ खाली दोन वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने; किंवा

(ख) जो अपराध, भारतात केला गेला असता तर या अधिनियमाखाली किंवा उपरोक्त कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली तेवढ्याच मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र झाला असता त्या अपराधाबद्दल इतर कोणत्याही देशातील न्यायालयाने किंवा अधिकरणाने

दोषी ठरवले असून तिला कारागृहातून सुटल्यानंतर पाच वर्षांच्या कालावधीत या अधिनियमाखाली किंवा त्या कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली दोन वर्षे किंवा त्याहून जास्त मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या न्यायालयाने पुन्हा दोषी ठरवले तर, असे न्यायालय स्वतःला योग्य वाटल्यास अशा व्यक्तीच्या कारावासाचा शिक्षादेश देण्याच्या वेळी असाही आदेश देऊ शकेल की, कारावासातून सुटका झाल्यानंतर तिचे राहण्याचे ठिकाण आणि अशा राहण्याच्या ठिकाणातील कोणताही बदल किंवा तेथील अनुपस्थिती याबाबत कलम २३ खाली करण्यात आलेल्या नियमांनुसार त्या शिक्षेच्या समाप्तीच्या तारखेपासून पाच वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीपर्यंत कळवीत जावे.

(२) जर अशी दोषसिद्धी अपिलान्ती किंवा अन्यथा रद्द ठरवण्यात आली तर, असा आदेश रद्दबातल होईल.

(३) आपल्या पुनरीक्षण शक्तींचा वापर करत असताना अपील न्यायालय किंवा उच्च न्यायालय या कलमाखालील आदेश सुद्धा देऊ शकेल.

(४) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही नियमाचा भंग केल्याचा दोषारोप ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला असेल अशा कोणाही व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण म्हणून लगतपूर्वी कळवण्यात आलेले ठिकाण जेथे असेल त्या जिल्ह्यातील सक्षम अधिकारितेच्या दंडाधिकाऱ्याला तिची संपरीक्षा करता येईल.

१२. (१) जेव्हा या अधिनियमाखाली एखाद्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला दोषी धरणाऱ्या न्यायालयाने असे ठरवले की, ती व्यक्ती तो अपराध किंवा या अधिनियमाखालील इतर कोणताही अपराध सरावाने करीत आलेली आहे किंवा करण्याचा प्रयत्न करीत आलेली आहे किंवा करण्यास अपप्रेरणा देत आलेली आहे, आणि जेव्हा त्या व्यक्तीला चांगल्या वागणुकीसंबंधीचे बंधपत्र करून द्यावयास लावणे आवश्यक अथवा इष्ट आहे असे न्यायालयाचे मत होईल तेव्हा त्याबाबतीत, त्या व्यक्तीविरुद्ध निर्णय देताना असे न्यायालय, त्या व्यक्तीने न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल तिच्या ऐपतीच्या प्रमाणात असेल इतक्या रकमेचे बंधपत्र जामीनदारांसहित किंवा त्यांच्याविना करून द्यावे असा आदेश देऊ शकेल. सराईत गुन्हेगारांच्या सद्वर्तनाबद्दल जामीन.

(२) जर अपिलान्ती किंवा अन्यथा दोषसिद्धी रद्द ठरवण्यात आली तर, अशा रीतीने करून दिलेले बंधपत्र रद्दबातल ठरेल.

(३) आपल्या पुनरीक्षण शक्तींचा वापर करत असताना अपील न्यायालय किंवा उच्च न्यायालय-सुद्धा या कलमाखालील आदेश देऊ शकेल.

(४) जेव्हा एखाद्या दंडाधिकाऱ्यास पोलिसांकडून किंवा अन्यथा अशी माहिती मिळेल की, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत एखादी व्यक्ती या अधिनियमाखालील एखादा अपराध सरावाने करीत आहे किंवा करण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा करण्यास अपप्रेरणा देत आहे, तेव्हा तो दंडाधिकारी अशा व्यक्तीला, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत तिने चांगली वागणूक ठेवण्याबद्दल जामीनदारांसहित बंधपत्र करून द्यावे असा आदेश का देण्यात येऊ नये या-संबंधी कारण दाखवण्याबद्दल फर्मावू शकेल आणि अशा प्रकरणात [१][ 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याची कलमे १११ ते १२३ ] यांचे उपबंध लागू होतील.

१३. (१) राज्य शासनाकडून याबाबत विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या प्रत्येक क्षेत्रासाठी, त्या क्षेत्रामध्ये या अधिनियमाखाली होणाऱ्या अपराधांसंबंधात कार्यवाही करण्यासाठी त्या शासनाद्वारे किंवा त्याच्या वतीने एक विशेष पोलीस अधिकारी नियुक्त केलेला असेल. विशेष पोलीस अधिकारी व सल्लागार मंडळ.

[२][ (२) विशेष पोलीस अधिकारी हा पोलीस निरीक्षकापेक्षा खालच्या दर्जाचा असणार नाही

(२क) जिल्हा दंडाधिकारी, जर त्यास तसे आवश्यक किंवा समयोचित वाटले तर, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली एखाद्या विशेष पोलीस अधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींपैकी सर्व किंवा काही शक्ती विशिष्ट प्रकरणांच्या किंवा प्रकरणवर्गांच्या अथवा सरसकट सर्व प्रकरणांच्या संबंधात सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याला किंवा सेनाधिकाऱ्याला प्रदान करू शकेल :

परंतु,

(क) सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याने, सेवानिवृत्तीच्या वेळी निरीक्षकापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण केलेले असल्याखेरीज, अशा अधिकाऱ्याला;

(ख) सेवानिवृत्त सेवा अधिकाऱ्याने, सेवानिवृत्तीच्या वेळी राजादिष्ट अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण केलेले असल्याखेरीज अशा अधिकाऱ्याला

अशी कोणतीही शक्ती प्रदान केली जाणार नाही. ]

(३) या अधिनियमाखालील अपराधांच्या संबंधातील आपली कामे कार्यक्षमतापूर्वक पार पाडण्या-साठी,—

(क) त्या क्षेत्रातील विशेष पोलीस अधिकाऱ्याच्या मदतीस राज्य शासनास योग्य वाटतील इतके दुय्यम पोलीस अधिकारी (यामध्ये व्यवहार्य असेल तेथे स्त्री-पोलीस अधिकारीही असतील) देण्यात येतील; आणि

(ख) राज्य शासन या अधिनियमाच्या कामकाजाच्या संबंधातील सर्वसाधारण महत्त्वाच्या प्रश्नांवर विशेष पोलीस अधिकाऱ्याला सल्ला देण्यासाठी एक बिनसरकारी सल्लागार मंडळ त्याच्या मदतीस देऊ शकेल. हे मंडळ त्या क्षेत्रातील जास्तीत जास्त पाच अग्रगण्य समाजकल्याण कार्यकर्ते मिळून बनलेले असेल (यांमध्ये व्यवहार्य असेल तेथे समाजकल्याण कार्यकर्त्याही असतील).

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. किता—कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

अपराध दखलपात्र असणे.

१४. १[ 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) ] यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली दंडनीय असलेला कोणताही अपराध त्या संहितेच्या अर्थानुसार दखलपात्र अपराध असल्याचे मानले जाईल :

परंतु, त्या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) वॉरंटाशिवाय अटक केवळ विशेष पोलीस अधिकाऱ्यांकडून किंवा त्याच्या निदेशानुसार किंवा त्याच्या मार्गदर्शनाखाली किंवा त्याच्या पूर्वसंमतीनेच केली जाईल;

(दोन) जेव्हा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीला आपल्या अनुपस्थितीत वॉरंटाशिवाय अटक करण्याविषयी एखादा विशेष पोलीस अधिकारी आपल्या हाताखालील एखाद्या अधिकाऱ्यास फर्मावील तेव्हा, कोणत्या व्यक्तीला अटक करावयाची आणि कोणत्या अपराधाबद्दल अटक करावयाची आहे ते विनिर्दिष्ट करणारा लेखी आदेश तो दुय्यम अधिकाऱ्यास देईल, आणि दुय्यम अधिकारी त्या व्यक्तीला अटक करण्यापूर्वी तिला आदेशाचा सारांश सांगेल आणि अशा व्यक्तीने मागणी केल्यास तिला तो आदेश दाखवील;

(तीन) विशेष पोलीस अधिकाऱ्याने २[फौजदारापेक्षा] कमी दर्जा नसलेल्या ज्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास खास प्राधिकृत केले असेल त्याला जर असे सकारण वाटले की, विशेष पोलीस अधिकाऱ्याचा आदेश मिळवण्यात होणाऱ्या विलंबामुळे या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या संबंधातील कोणताही महत्त्वाचा पुरावा नष्ट केला जाण्याचा किंवा लपविला जाण्याचा संभव आहे, अथवा ज्या व्यक्तीने अपराध केला असेल किंवा जिच्यावर अपराध केल्याचा वहीम असेल ती व्यक्ती पळून जाण्याचा संभव आहे, अथवा जर अशा व्यक्तीचे नाव व पत्ता अज्ञात असेल किंवा त्या व्यक्तीने खोटे नाव व पत्ता दिला आहे असा संशय घेण्यास कारण असेल तर, तो असे आदेश न घेता संबंधित व्यक्तीस अटक करू शकेल, परंतु अशा बाबतीत, तो शक्य तितक्या लवकर विशेष पोलीस अधिकाऱ्यास अटकेसंबंधीचे व ज्या परिस्थितीत अटक करण्यात आली त्यासंबंधीचे वृत्त कळवील.

वॉरंटाशिवाय झडती.

१५. (१) त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,३ एखाद्या वास्तूमध्ये राहाणाऱ्या एखाद्या स्त्रीच्या किंवा मुलीच्या बाबतीत या अधिनियमाखाली शिक्षापात्र ठरणारा एखादा अपराध करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे आणि वॉरंट घेऊन त्या वास्तूची झडती घ्यावयाची झाली तर गैरवाजवी विलंब झाल्याशिवाय राहाणार नाही असे समजण्यास जेव्हा जेव्हा एखाद्या विशेष पोलीस अधिकाऱ्याकडे वाजवी कारणे असतील तेव्हा तेव्हा, अशा अधिकाऱ्यास, आपल्या समजामागील कारणांची नोंद करून नंतर, अशा वास्तूमध्ये वॉरंटाशिवाय प्रवेश करून तेथे झडती घेता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये झडती घेण्यापूर्वी, विशेष पोलीस अधिकारी, झडती घ्यावयाचे ठिकाण ज्या स्थानिक भागात असेल त्या भागातील दोन किंवा त्याहून अधिक प्रतिष्ठित रहिवाशांना (त्यामध्ये निदान एक महिला असेल) उपस्थित राहून झडतीला साक्षी राहण्यासाठी पाचारण करील आणि तसे करण्याबद्दल त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही तो लेखी आदेश देऊ शकेल :

४[परंतु, झडती घ्यावयाचे ठिकाण ज्या स्थानिक भागात आहे त्या भागातील प्रतिष्ठित रहिवासी असण्याबाबतची आवश्यकता झडतीच्या वेळी साक्षी म्हणून उपस्थित राहण्यासाठी पाचारण केलेल्या स्त्रीला लागू होणार नाही.]

(३) जी कोणतीही व्यक्ती, तिच्याकडे लेखी आदेश सुपूर्द करून किंवा देऊ करून किंवा तिला या कलमाखालील झडतीच्या वेळी उपस्थित होऊन साक्षी राहण्यास फर्मावण्यात आले असता, वाजवी कारणाशिवाय, तसे करण्यास नकार देईल किंवा त्याबाबत उपेक्षा करील त्या व्यक्तीने 'भारतीय दंड संहिता १८६०' (१८६० चा ४५) कलम १८७ खाली अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

४[(४) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही वास्तूमध्ये प्रवेश करणाऱ्या विशेष पोलीस अधिकाऱ्याला,—

(क) त्याच्या मते जर तेथील एखादी स्त्री वेश्याव्यवसाय करीत असेल किंवा तिला तो करावयास लावला जात असेल किंवा तिला तो करावयास लावण्यासाठी प्रयत्न केले जात असतील तर, त्या स्त्रीला; किंवा

(ख) त्याच्या मते तेथील एखादी मुलगी एकवीस वर्षांपेक्षा कमी वयाची असून ती वेश्याव्यवसाय करीत असेल किंवा तिला तो करावयास लावला जात असेल किंवा तिला तो करावयास लावण्यासाठी प्रयत्न केले जात असतील तर, त्या मुलीला

त्या जागेतून हलवण्याचा हक्क असेल.]

(५) पोटकलम (४) अन्वये ५[त्या स्त्रीस किंवा मुलीस] त्या जागेतून हलवल्यानंतर, विशेष पोलीस अधिकारी ताबडतोब तिला योग्य त्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करील.

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १० द्वारे "निरीक्षक" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—कलम ११ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता—कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

५. कित्ता—कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी तेव्हापासून).

(६) सदर विशेष पोलीस अधिकारी व झडतीमध्ये भाग घेणाऱ्या किंवा त्या वेळी उपस्थित होऊन साक्षी राहणाऱ्या इतर व्यक्ती, झडतीच्या संबंधात किंवा त्या प्रयोजनासाठी त्यांनी कायदेशीर रीत्या केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरणार नाहीत.

¹[(७) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याचे उपबंध ज्याप्रमाणे उक्त संहितेच्या कलम ९४ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये केलेल्या कोणत्याही झडतीस लागू होतात त्याप्रमाणे ते, शक्य होईल तेथवर, या कलमाखालील कोणत्याही झडतीस लागू होतील.].

**स्त्रीला किंवा मुलीला संकटमुक्त करणे.**

²[१६. (१) (क) एखाद्या स्त्रीला वेश्यागृहात वेश्याव्यवसाय करावयास लावला जात आहे; किंवा

(ख) एखादी मुलगी सकृद्दर्शनी एकवीस वर्षे वयाखालील असून ती एखाद्या वेश्यागृहात राहात आहे किंवा वेश्याव्यवसाय करीत आहे किंवा तिला तो करावयास लावला जात आहे,

असे जर पोलिसांकडून अथवा यासंबंधात राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मिळालेल्या माहितीवरून एखाद्या दंडाधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर, तो त्या बाबतीत फौजदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला, अशा वेश्यागृहात प्रवेश करून त्या स्त्रीला किंवा मुलीला तेथून हलवण्याचा आणि आपल्यासमोर हजर करण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) त्या स्त्रीस किंवा मुलीस तेथून हलवल्यानंतर तो पोलीस अधिकारी आदेश काढणाऱ्या दंडाधिकाऱ्यासमोर तिला ताबडतोब हजर करील.]

**कलम १५अन्वये हलवण्यात आलेल्या किंवा कलम १६ अन्वये संकटमुक्त करण्यात आलेल्या स्त्रियांची व मुलींची मध्यंतरीच्या काळातील अभिरक्षा.**

²[१७. (१) कलम १५ च्या पोटकलम (४) अन्वये एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला वेश्यागृहाबाहेर हलवणारा विशेष पोलीस अधिकारी किंवा कलम १६ च्या पोटकलम (१) अन्वये एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला संकटमुक्त करणारा विशेष पोलीस अधिकारी हा, कलम १५ च्या पोटकलम (५) खाली किंवा कलम १६ च्या पोटकलम (२) खाली आवश्यक असल्याप्रमाणे त्या मुलीला ताबडतोब दंडाधिकाऱ्यापुढे हजर करू शकला नाही तर, तो ताबडतोब तिला कोणत्याही वर्गाच्या सर्वांत जवळच्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करील, आणि तो दंडाधिकारी, त्या मुलीला योग्य त्या दंडाधिकाऱ्यापुढे किंवा, प्रकरणपरत्वे, आदेश काढणाऱ्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर करण्यात येईतोपर्यंत तिला सुरक्षित ताब्यात ठेवण्यासाठी स्वतःला योग्य वाटतील असे आदेश देईल :

परंतु, कोणत्याही स्त्रीला किंवा मुलीला,—

(एक) या पोटकलमाखालील आदेशाच्या दिनांकापासून दहा दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत या पोटकलमान्वये अभिरक्षेत अडकवून ठेवले जाणार नाही; किंवा

(दोन) तिच्यावर अनिष्ट परिणाम करू शकेल अशा व्यक्तीच्या ताब्यात परत पाठवले किंवा ठेवले जाणार नाही.

(२) त्या स्त्रीस अथवा मुलीस कलम १५ च्या पोटकलम (५) अन्वये योग्य त्या दंडाधिकाऱ्यापुढे किंवा कलम १६ च्या पोटकलम (२) अन्वये दंडाधिकाऱ्यापुढे हजर केले जाईल तेव्हा, त्या स्त्रीला किंवा मुलीला तिची बाजू मांडण्याची संधी देऊन नंतर असा दंडाधिकारी, कलम १६ च्या पोटकलम (१) अन्वये मिळालेली माहिती कितपत बरोबर आहे याबाबत, त्या स्त्रीचे किंवा मुलीचे वय, चारित्र्य व पूर्वेतिहास याबाबत आणि तिचा ताबा घेण्याची तिच्या माता-पित्यांची, पालकाची किंवा पतीची लायकी आणि तिला घरी पाठवल्यास घरातील वातावरणाचा तिच्यावर जो परिणाम होण्याची शक्यता आहे त्याचे स्वरूप याबाबत चौकशी करवील, आणि या प्रयोजनार्थ तो 'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) या अन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याला वरील परिस्थिती आणि त्या स्त्रीचे अथवा मुलीचे व्यक्तिमत्त्व आणि तिच्या पुनर्वसनाची शक्याशक्यता याबाबत चौकशी करण्याचे निदेश देऊ शकेल :

(३) पोटकलम (२) अन्वये एखाद्या प्रकरणात चौकशी करण्यात येत असताना, दंडाधिकारी त्या स्त्रीच्या अथवा मुलीच्या सुरक्षित ताब्यासाठी त्याला योग्य वाटतील असे आदेश देऊ शकेल :

परंतु, कोणत्याही स्त्रीला अथवा मुलीला अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन आठवड्यांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत अभिरक्षेत ठेवले जाणार नाही, आणि कोणत्याही स्त्रीला अथवा मुलीला, तिच्यावर अनिष्ट परिणाम करण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीच्या ताब्यात ठेवले जाणार नाही.

(४) पोटकलम (२) अन्वये आवश्यक असलेली चौकशी केल्यानंतर जर दंडाधिकाऱ्याची अशी खात्री झाली की,—

(क) मिळालेली माहिती बरोबर आहे; आणि

(ख) तिची देखभाल करण्याची आणि तिला संरक्षण देण्याची गरज आहे,

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

तर तो, पोटकलम (५) च्या उपबंधांच्या अधीनतेने, आदेश काढून त्याद्वारे, अशा स्त्रीला किंवा मुलीला, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे किमान एक वर्ष आणि कमाल तीन वर्षे इतक्या कालावधीपर्यंत सुरक्षागृहात किंवा काही कारणास्तव--ती कारणे लेखी नमूद करावी लागतील--त्याला योग्य वाटेल अशा अन्य अभिरक्षेत अडकवून ठेवावे असे फर्मावू शकेल :

परंतु, अशा स्त्रीला अथवा मुलीला ज्यांच्या अभिरक्षेत ठेवावयाचे त्या व्यक्तीचा अथवा मंडळींचा धर्म त्या स्त्रीच्या अथवा मुलीच्या धर्माहून निराळा असता कामा नये आणि ज्यांच्याकडे अशा स्त्रीचा अथवा मुलीचा ताबा सोपवण्यात आला आहे त्या व्यक्तींना--सुरक्षागृहाच्या प्रभारी व्यक्तीसुद्धा--एक बंधपत्र लिहून देण्यास फर्मावता येईल, व अशा बंधपत्रात आवश्यक आणि व्यवहार्य असेल तेथे, अशा स्त्रीची किंवा मुलीची योग्य ती देखभाल, तिचे पालकत्व, शिक्षण, प्रशिक्षण आणि तिच्यावरील औषधोपचार आणि मानसोपचार तसेच, न्यायालयाने नियुक्त केलेल्या व्यक्तीने करावयाची देखरेख यांसंबंधीच्या निदेशांवर आधारित अशी अभिवचने अंतर्भूत असू शकतील आणि ते बंधपत्र जास्तीत जास्त तीन वर्षांच्या कालावधी-पर्यंत अंमलात राहील.

(५) पोटकलम (२) खालील आपली कार्ये पार पाडताना, दंडाधिकारी पाच प्रतिष्ठित व्यक्तींचे मंडळ आपल्या मदतीसाठी बोलावू शकेल, त्यापैकी शक्य असेल तेथे तीन महिला असतील; आणि त्या प्रयोजनासाठी स्त्रिया व मुली यांच्या अपव्यापारास आळा घालण्याच्या कार्यक्षेत्रातील अनुभवी समाज-कल्याण कार्यकर्त्यांची--विशेषत: महिला समाजकल्याण कार्यकर्त्यांची एक यादी तो ठेवू शकेल.

(६) पोटकलम (२) खालील प्रत्येक आदेशावर सत्र न्यायाधीशाकडे अपील करता येईल आणि अशा अपिलान्ती त्याने दिलेला निर्णय अंतिम असेल.]

**वेश्यागृह बंद करणे आणि त्या जागेतून अपराध्यांना काढून लावणे.**

१८. (१) कलम ७ च्या पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणापासून [1][दोनशे मीटरच्या] आत असलेले कोणतेही घर, खोली, जागा किंवा तिचा कोणताही भाग या ठिकाणी कोणत्याही व्यक्तीकडून वेश्यागृह चालवले जात आहे किंवा वेश्यागृह म्हणून त्याचा वापर केला जात आहे किंवा आपला धंदा चालवण्यासाठी वेश्यांकडून त्याचा वापर केला जात आहे अशी पोलिसांकडून किंवा अन्य रीतीने माहिती मिळाल्यावर दंडाधिकारी, अशा घराच्या, खोलीच्या, जागेच्या किंवा भागाच्या मालकावर, पट्टाकारावर किंवा भाडेमालकावर अथवा मालकाच्या, पट्टाकाराच्या किंवा भाडेमालकाच्या अभिकर्त्यावर अथवा असे घर, खोली, जागा किंवा त्याचा भाग याचा भाडेकरू, पट्टेदार, भोगवटादार किंवा ती जागा ज्याच्या हुकमतीत असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीवर नोटीस बजावून, अशा जागेचा अयोग्य वापर केल्याबद्दल टाच का आणण्यात येऊ नये याची कारणे नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत दाखवा असे फर्मावू शकेल; आणि संबंधित व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्यानंतर, जर, त्या घराचा, खोलीचा, जागेचा किंवा त्या भागाचा वेश्यागृह म्हणून किंवा वेश्याव्यवसाय चालवण्यासाठी वापर केला जात आहे याबद्दल दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर दंडाधिकारी आदेश काढून त्याद्वारे,---

(क) आदेश काढल्यापासून सात दिवसांच्या आत त्या घरातून, खोलीतून, जागेतून किंवा भागातून भोगवटदारास काढून टाकण्यास फर्मावू शकेल;

(ख) आदेश काढल्याच्या लगतनंतरच्या एक वर्षाच्या मुदतीत ते घर, खोली, जागा किंवा भाग भाड्याने देण्यापूर्वी मालकाने, पट्टाकाराने किंवा भाडेमालकाने अथवा मालक, पट्टाकार किंवा भाडेमालक यांच्या अभिकर्त्याने दंडाधिकाऱ्याची पूर्वमान्यता मिळवली पाहिजे असे फर्मावू शकेल :

परंतु, मालकास, पट्टाकारास किंवा भाडेमालकास, तसेच मालकाचा, पट्टाकाराचा किंवा भाडेमालकाचा अभिकर्ता यास घर, खोली, जागा किंवा त्याचा भाग यांच्या अयोग्य वापराबद्दल काहीही माहिती नव्हती असे दंडाधिकाऱ्यास आढळून आल्यास, दंडाधिकारी जी व्यक्ती अशा घराचा, खोलीचा, जागेचा किंवा भागाच अयोग्य वापर करू देत होती अशा व्यक्तीला किंवा तिच्या फायद्यासाठी ती जागा भाडेपट्टयाने देण्यात येऊ नये अथवा अन्यथा तिचा कब्जा देण्यात येऊ नये असा निदेश देऊन, मालकास, पट्टाकारास किंवा भाडेमालकास अथवा मालकाच्या, पट्टाकाराच्या किंवा भाडेमालकाच्या अभिकर्त्यास त्याचा कब्जा परत देण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) कलम ३ किंवा कलम ७ खालील कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीस दोषी ठरवणारे न्यायालय, आवश्यक असल्याप्रमाणे अशा व्यक्तीला कारण दाखवण्याबद्दल आणखी कोणतीही नोटीस न देता, त्या पोटकलमान्वये आदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये दंडाधिकाऱ्याने किंवा न्यायालयाने दिलेले आदेश अपीलपात्र असणार नाहीत आणि कोणत्याही दिवाणी अथवा फौजदारी न्यायालयाच्या आदेशावरून ते स्थगित करता येणार नाहीत किंवा रद्द ठरवता येणार नाहीत, आणि एक वर्ष संपल्यानंतर उक्त आदेशांची विधिग्राह्यता संपुष्टात येईल :

परंतु, कलम ३ किंवा कलम ७ खालील दोषसिद्धी ही, असे घर, खोली, जागा किंवा तिचा कोणताही भाग या ठिकाणी वेश्यागृह चालवले जात नाही किंवा त्याचा तसा वापर केला जात नाही किंवा आपला धंदा चालवण्यासाठी वेश्यांकडून त्याचा वापर केला जात नाही या कारणावरून अपिलान्ती रद्द ठरवण्यात आली

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

तर त्या बाबतीत, पोटकलम (१) खाली कोणत्याही संपरीक्षा न्यायालयाने काढलेला कोणताही आदेश-देखील रद्द ठरवण्यात येईल.

(४) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा पोटकलम (१) अन्वये दंडाधिकारी आदेश काढील किंवा पोटकलम (२) अन्वये न्यायालय आदेश काढील तेव्हा, त्यावेळी ज्या अन्वये असे घर, खोली, जागा किंवा भाग यांचा कब्जा घेतला गेला असेल असा कोणताही भाडेपट्टा किंवा करार शून्य व अप्रवर्ती होईल.

(५) एखादा मालक, पट्टाकार किंवा भाडेमालक अथवा अशा मालकाचा, पट्टाकाराचा किंवा भाडेमालकाचा अभिकर्ता पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये दिलेल्या निदेशाचे पालन करण्यास चुकेल तेव्हा, तो पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल किंवा त्या पोटकलमाच्या परंतुकाखालील निदेशाचे पालन करण्यास तो चुकेल तेव्हा, कलम ३, पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये किंवा प्रकरणपरत्वे, कलम ७, पोटकलम (२) च्या खंड (ग) अन्वये त्याने अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याला शिक्षा देण्यात येईल.

**सुरक्षागृहात ठेवले जाण्यासाठी किंवा न्यायालयाकडून देखभाल केली जाण्यासाठी व संरक्षण मिळण्यासाठी अर्ज.**

[1][ १९. (१) जी स्त्री किंवा मुलगी वेश्याव्यवसाय करीत असेल किंवा जिला तो करावयास लावले जात असेल अशी कोणतीही स्त्री किंवा मुलगी, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादित ती वेश्याव्यवसाय करीत असेल किंवा तिला तो व्यवसाय करावयास लावले जात असेल अशा दंडाधिकाऱ्याकडे—

(क) आपणांस सुरक्षागृहात ठेवण्यात यावे, किंवा ;

(ख) पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने न्यायालयाकडून आपली देखभाल करण्यात यावी आणि आपल्याला संरक्षण मिळावे

असा आदेश मिळावा म्हणून अर्ज करू शकेल.

(२) पोटकलम (३) अन्वये चौकशी होईपर्यंत, दंडाधिकारी प्रकरणाची, परिस्थिती विचारात घेता, त्यास योग्य वाटेल अशा अभिरक्षेत अशा स्त्रीला किंवा मुलीला ठेवण्यासंबंधी निदेश देऊ शकेल.

(३) अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यावर आणि जर अर्जदाराचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या घरातील वातावरण आणि पुनर्वसनाबाबतची शक्याशक्यता याबाबत स्वतःला आवश्यक वाटेल अशी चौकशी—'अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८' (१९५८ चा २०) या अन्वये नियुक्त केलेल्या परिवीक्षा अधिकाऱ्याने केलेली चौकशीसुद्धा—झाल्यानंतर या कलमाखाली आदेश काढला पाहिजे याबद्दल दंडाधिकाऱ्याची खात्री पटली तर, कारणे लेखी नमूद करून तो असा आदेश देऊ शकेल की,

आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत अर्जदारास—

(एक) सुरक्षागृहात, किंवा

(दोन) सुधारसंस्थेत, किंवा ;

(तीन) दंडाधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या व्यक्तीच्या देखरेखीखाली

ठेवण्यात यावे. ]

**वेश्येला कोणत्याही जागेतून हलवणे.**

२०. (१) आपल्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादितील कोणत्याही ठिकाणी राहणारी किंवा तेथे वरचेवर ये-जा करणारी स्त्री किंवा मुलगी वेश्या आहे अशी माहिती दंडाधिकाऱ्यास मिळाल्यावर मिळालेल्या माहितीचा सारांश नोंदवून तो अशा स्त्रीला किंवा मुलीला तिने त्या दंडाधिकाऱ्यापुढे हजर रहावे आणि तिला त्या जागेतून निघून जाण्यास का सांगू नये व पुन्हा तेथे प्रवेश करण्यास मनाई का करू नये याबद्दलचे कारण दाखवावे असे फर्मावणारी नोटीस काढू शकेल.

(२) पोटकलम (१) खाली काढलेल्या प्रत्येक नोटिशीला उपरोक्त नोंदीची एक प्रत जोडण्यात येईल, आणि ज्या स्त्रीविरुद्ध किंवा मुलीविरुद्ध अशी नोटीस काढण्यात आली असेल त्या स्त्रीवर किंवा मुलीवर नोटिशीबरोबरच ती प्रतदेखील बजावण्यात येईल.

(३) पोटकलम (२)मध्ये निर्दिष्ट केलेली नोटीस बजावल्यानंतर, दंडाधिकारी मिळालेल्या माहितीची सत्यासत्यता पडताळून पहाण्यासाठी चौकशी सुरू करील, आणि त्या स्त्रीला किंवा मुलीला पुरावा रुजू करण्याची संधी दिल्यानंतर त्याला योग्य वाटेल असा आणखी पुरावा घेईल, आणि ती स्त्री किंवा मुलगी वेश्या आहे आणि सर्वसाधारण जनतेच्या हिताच्या दृष्टीने अशा स्त्रीला किंवा मुलीला तेथून निघून जाण्यास सांगणे आणि तिला तेथे पुन्हा प्रवेश करण्यास मनाई करणे आवश्यक आहे असे दंडाधिकाऱ्याला अशा चौकशीअंती वाटले तर, तो लेखी आदेश काढून त्यात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने त्या स्त्रीला किंवा मुलीला तो आदेश कळवील आणि त्याद्वारे, आदेशाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, परंतु जी अलीकडची नाही अशा अमुक एका तारखेनंतर (ती तारीख आदेशात निर्दिष्ट करावयाची), आदेशात निर्दिष्ट केले असेल अशा मार्गाने किंवा मार्गांनी आणि अशा कालावधीत तिला त्या जागेतून त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादेच्या आतील किंवा बाहेरील अशा कोणत्याही ठिकाणी निघून जाण्यास फर्मावील आणि अशा ठिकाणी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याची लेखी परवानगी असल्याखेरीज त्या ठिकाणी पुन्हा प्रवेश करण्यास मनाई करील.

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(४) जो कोणी–

(क) या कलमाखाली दिलेल्या आदेशाचे त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत पालन करण्यात कसूर करील, किंवा एखाद्या ठिकाणी परवानगीखेरीज पुन्हा प्रवेश करण्यास तिला मनाई करणारा आदेश अंमलात असताना त्या ठिकाणी परवानगीशिवाय पुन्हा प्रवेश करील, किंवा

(ख) एखाद्या स्त्रीला किंवा मुलीला या कलमान्वये निघून जाण्यास फर्मावण्यात आले आहे आणि तेथे पुन्हा प्रवेश करण्यासाठी लागणारी परवानगी तिने घेतलेली नाही हे माहीत असूनही अशा स्त्रीला किंवा मुलीला त्या ठिकाणी आश्रय देईल किंवा लपवील,

तो दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि जर हा अपराध पुढे चालू राहिला तर, पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी तो किंवा ती अपराध चालू ठेवील त्या प्रत्येक दिवसागणिक वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल.

सुरक्षागृहे. २१. (१) राज्य शासन स्वविवेकानुसार [1][या अधिनियमान्वये त्याला योग्य वाटतील तितकी सुरक्षागृहे किंवा सुधारसंस्था स्थापन करू शकेल आणि अशी सुरक्षागृहे किंवा सुधारसंस्था] स्थापन झाल्या-नंतर, विहित करण्यात येईल अशा पद्धतीने ती चालवण्यात येतील.

(२) राज्य शासनाखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, राज्य शासनाने या कलमाखाली दिलेले लायसन घेतल्याशिवाय आणि त्याच्या शर्तीचे अनुसरण केल्याखेरीज कोणतेही [1][सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था] स्थापन करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही.

(३) राज्य शासन, कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने याबाबत त्यांच्याकडे अर्ज केल्या-नंतर, अशा व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला [1][सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था] स्थापन करून चालविण्यासाठी किंवा प्रकरणपरत्वे, चालविण्यासाठी विहित नमुन्यात लायसन देऊ शकेल आणि अशा रीतीने देण्यात आलेल्या लायसनामध्ये राज्य शासनाच्या या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांनुसार ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा शर्ती समाविष्ट असू शकतील :

परंतु, अशा तऱ्हेच्या कोणत्याही शर्तीनुसार [1][सुरक्षागृहाची किंवा सुधारसंस्थेची] व्यवस्था, शक्य असेल तेथे एखाद्या स्त्रीकडे सोपविण्यात यावी असे आवश्यक करता येईल :

परंतु आणखी असे की, या अधिनियमाच्या प्रारंभकाळी कोणतेही [1][सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था] चालवणाऱ्या––व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला अशा लायसनाकरिता अर्ज करण्यासाठी अशा प्रारंभापासूनच सहा महिन्यांचा अवधी देण्यात येईल :

[1][परंतु असे ही की, 'स्त्रिया व मुली अपव्यापार दमन (विशोधन) अधिनियम, १९७८' याच्या प्रारंभाच्या वेळी कोणतीही सुधारसंस्था चालवणाऱ्या एखाद्या व्यक्तीला किंवा प्राधिकरणाला अशा लायसनाकरिता अर्ज करण्यासाठी अशा प्रारंभापासून सहा महिन्यांची मुदत दिली जाईल].

(४) लायसन देण्यापूर्वी राज्य शासन, अशा प्रयोजनाकरिता ते नियुक्त करील अशा अधिकाऱ्याला किंवा प्राधिकरणाला, याबाबत आलेल्या अर्जासंबंधात संपूर्ण व सांगोपांग चौकशी करावयास आणि अशा चौकशीचा निष्कर्ष आपणांस कळवण्यास सांगू शकेल आणि अशी चौकशी करताना तो अधिकारी किंवा प्राधिकरण विहित पद्धती अनुसरील.

(५) लायसन, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत अंमलात राहील, मात्र तत्पूर्वी ते रद्द करण्यात आले तर गोष्ट अलाहिदा, आणि त्याची मुदत संपण्याच्या तारखेच्या कमीतकमी तीस दिवस अगोदर त्याकरिता अर्ज करण्यात आल्यास तेवढ्याच कालावधीपर्यंत त्याचे नूतनीकरण करण्यात येईल.

(६) या अधिनियमानुसार देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले कोणतेही लायसन हस्तांतरित करता येणार नाही.

(७) ज्यास या अधिनियमान्वये लायसन मंजूर करण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने अथवा अशा व्यक्तींच्या किंवा प्राधिकरणाच्या एखाद्या अभिकर्त्याने किंवा नोकराने त्यातील शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा किंवा या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचा किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमांपैकी कोणत्याही नियमाचा भंग केला असेल तर अथवा कोणत्याही [1][सुरक्षागृहाची किंवा सुधारसंस्थेची] स्थिती, व्यवस्थापन किंवा देखरेख याबाबत राज्य शासनाचे समाधान झाले नसेल तर त्याबाबतीत या अधिनियमाखाली जी अन्य कोणतीही शिक्षा लागू झाली असेल तिला बाध न येता, राज्य शासनाला कारणे लेखी नमूद करून लेखी आदेशाद्वारे लायसन रद्द करता येईल।

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

परंतु लायसन का रद्द करण्यात येऊ नये याविषयी कारणे दाखवण्याबाबत लायसनधारकास संधी देण्यात येईपर्यंत असा आदेश काढण्यात येणार नाही.

(८) [1][सुरक्षागृहाच्या किंवा सुधारसंस्थेच्या] संबंधातील लायसन पूर्ववर्ती पोटकलमाखाली रद्द करण्यात आले असेल त्याबाबतीत, लायसन रद्द केल्याच्या तारखेपासून अशा [1][सुरक्षागृहाचे किंवा सुधारसंस्थेचे] काम बंद होईल.

(९) याबाबत करण्यात येतील त्या नियमांपैकी कोणत्याही नियमाच्या अधीनतेने, राज्य शासनास या अधिनियमाखाली दिलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या कोणत्याही लायसनात बदल करता येईल किंवा दुरुस्ती करता येईल.

[1][(९क) एखाद्या संस्थावासी व्यक्तीची वर्तणूक, तिला द्यावयाचे प्रशिक्षण आणि त्या प्रकरणाची अन्य परिस्थिती लक्षात घेता अशा व्यक्तीची बदली करणे इष्ट आहे असे वाटल्यास, राज्य शासन किंवा यासंबंधात प्राधिकृत करण्यात आलेले एखादे प्राधिकरण यासंबंधात करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, एका सुरक्षागृहातील संस्थावासीची दुसऱ्या सुरक्षागृहात किंवा एखाद्या सुधारसंस्थेत अथवा एका सुधारसंस्थेतील अशा संस्थावासीची दुसऱ्या सुधारसंस्थेत किंवा एखाद्या सुरक्षागृहात बदली करू शकेल :

परंतु,—

(क) या पोटकलमान्वये बदली करण्यात आलेल्या अशा कोणत्याही स्त्रीला अथवा मुलीला, ज्या सुरक्षागृहातून किंवा सुधारसंस्थेतून तिची बदली करण्यात आली तेथे तिने जेवढा काळपर्यंत राहणे आवश्यक होते त्यापेक्षा अधिक काळ, ज्या सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत तिची बदली केलेली असेल तेथे राहणे आवश्यक केले जाणार नाही ;

(ख) या पोटकलमान्वये केलेल्या बदलीच्या प्रत्येक आदेशाबद्दलची कारणे नमूद केली जातील.]

(१०) जो कोणीही एखादे [1][सुरक्षागृह किंवा सुधारसंस्था] या कलमाच्या उपबंधानुसार नव्हे तर अन्यथा स्थापन करील किंवा चालवील, तो, पहिल्यांदा केलेल्या अपराधाबद्दल एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास व दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर केलेल्या अपराधाबद्दल एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा दोन हजार रुपयांपर्यंन्त असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

२२. [3][महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी याच्या] न्यायालयापेक्षा कनिष्ठ असलेले कोणतेही न्यायालय हे कलम ३, कलम ४, कलम ५, कलम ६, कलम ७ किंवा कलम ८ खालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही. **संपरीक्षा.**

[4][२२क. (१) कोणत्याही जिल्ह्यातील किंवा महानगर क्षेत्रातील या अधिनियमाखालील गुन्ह्यांची संपरीक्षा सत्वर होण्याची व्यवस्था करण्यासाठी तसे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री पटली तर, ते शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, अशा जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी, किंवा प्रकरणपरत्वे, महानगर दंडाधिकारी यांची एक किंवा त्याहून अधिक न्यायालये स्थापन करू शकेल. **विशेष न्यायालये स्थापन करण्याची शक्ती.**

(२) उच्च न्यायालयाने अन्यथा निदेश दिले नसतील तर, पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले न्यायालय या अधिनियमाखालील प्रकरणांच्याच संबंधात आपल्या अधिकारितेचा वापर करील.

(३) पोटकलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याची अधिकारिता आणि शक्ती संपूर्ण जिल्ह्याला किंवा, प्रकरणपरत्वे महानगर क्षेत्राला लागू होतील.

(४) या कलमाच्या पूर्ववर्ती उपबंधांच्या अधीनतेने, कोणत्याही जिल्ह्यात किंवा महानगर क्षेत्रात पोटकलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेले कोणतेही न्यायालय हे 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) याचे कलम ११—पोटकलम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, कलम १६, पोटकलम (१) याअन्वये स्थापन करण्यात आलेले न्यायालय म्हणून समजण्यात येईल आणि त्या संहितेचे उपबंध तदनुसार अशा न्यायालयांना लागू होतील.

**स्पष्टीकरण** :—या कलमात "उच्च न्यायालय" याला 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) कलम २, खंड (ङ्) मध्ये दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे.

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम १५ द्वारे घातले (२ ऑक्टोबर १९७९ रोजी व तेव्हापासून).
३. कित्ता—कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ व तेव्हापासून).
४. कित्ता—कलम १७ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

प्रकरणाची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची न्यायालयाची शक्ती.

२२ख. 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन त्यास तसे आवश्यक वाटल्यास, या अधिनियमाखालील अपराधांची संपरीक्षा दंडाधिकाऱ्याकडून [तसेच कलम २२क च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या न्यायालयाचा पीठासीन अधिकारी धरून] संक्षिप्त रीत्या केली जावी असा निदेश देऊ शकेल आणि उक्त संहितेच्या २६२ ते २६५ पर्यंतच्या कलमांचे (दोन्ही धरून) उपबंध शक्य होईल तितपत, अशा संपरीक्षेला लागू होतील ;

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेत कोणतीही दोषसिद्धी झाल्यास त्या बाबतीत दंडाधिकाऱ्याने जास्तीत जास्त एक वर्ष मुदतीच्या कारावासाची शिक्षा देणे कायदेशीर ठरेल :

परंतु, आणखी असे की, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षा सुरू होण्याच्या वेळी किंवा ती चालू असताना जर, त्या प्रकरणी कदाचित एक वर्षाहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा द्यावी लागेल किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव, त्या प्रकरणाची संक्षिप्त रीत्या संपरीक्षा करणे इष्ट नाही असे दंडाधिकाऱ्यास वाटले तर, तो दंडाधिकारी, पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तशा आशयाचा आदेश नमूद करील आणि त्यानंतर, ज्याची आधी साक्ष तपासणी झालेली असेल अशा साक्षीदारास पुन्हा बोलावील आणि उक्त संहितेमध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने प्रकरणाची सुनावणी किंवा फेरसुनावणी करील.]

नियम करण्याची शक्ती.

२३. (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता अशा नियमांमध्ये पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येतील :—

(क) कोणतीही जागा सार्वजनिक ठिकाण म्हणून अधिसूचित करणे,

(ख) कलम १०—पोटकलम (१) अन्वये सुटका झालेल्या [1][ज्या स्त्रिया व मुली निराश्रित असतील त्यांना] किंवा ज्यांना सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्याचे आदेश मंजूर झालेले आहेत अशा स्त्रिया व मुली यांना अभिरक्षेत ठेवणे व त्यांचा चरितार्थ चालवणे ;

[1][(खख) कलम १०क च्या पोटकलम (३) अन्वये एखाद्या अपराध्याला सुधारसंस्थेतून मुक्त करणे आणि अशा अपराध्याला द्यावयाच्या लायसनाचा नमुना ;]

[2][(ग) या अधिनियमान्वये स्त्रियांना आणि मुलींना सुरक्षागृहामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे सुधारसंस्थांमध्ये अडकवून ठेवणे आणि त्यांचा चरितार्थ चालवणे ;]

(घ) सुटका झालेल्या सिद्धदोष व्यक्तींनी आपले राहण्याचे ठिकाण किंवा ते बदलल्यास तो बदल किंवा तेथील अनुपस्थिती कळवण्यासंबंधी कलम ११ मध्ये असलेल्या उपबंधांचे पालन करणे;

(ङ) कलम १३, पोटकलम (१) अन्वये विशेष पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा प्राधिकार प्रत्यायोजित करणे ;

(च) कलम १८ च्या उपबंधाची अंमलबजावणी करणे ;

[1][(छ) (एक) कलम २१ अन्वये सुरक्षागृहाची व सुधारसंस्थांची स्थापना करणे, ती/त्या चालविणे, त्यांचे व्यवस्थापन करणे व देखरेख करणे आणि अशा सुरक्षागृहांमध्ये किंवा सुधारसंस्थांमध्ये कामावर लावलेल्या व्यक्तींची नियुक्ती, शक्ती व कर्तव्ये ;

(दोन) लायसनासाठी ज्या नमुन्यात अर्ज करता येईल तो नमुना आणि अशा अर्जात भरावयाचा तपशील ;

(तीन) लायसन देण्यासंबंधीची किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासंबंधीची कार्यपद्धती, ज्या मुदतीत लायसन दिले पाहिजे किंवा त्याचे नूतनीकरण केले पाहिजे ती मुदत आणि लायसनासाठी येणाऱ्या अर्जाच्या संबंधात संपूर्ण व सांगोपांग चौकशी करण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(चार) लायसनाचा नमुना व त्यात विनिर्दिष्ट करावयाच्या शर्ती ;

(पाच) सुरक्षागृहाचे व सुधार संस्थेचे हिशेब कसे ठेवावयास हवेत व त्याची तपासणी कशी व्हावयास हवी ती पद्धती ;

(सहा) लायसनधारकाने नोंदवह्या व विवरणे ठेवणे, आणि अशा नोंदवह्यांचा व विवरणांचा नमुना ;

(सात) सुरक्षागृहातील व सुधारसंस्थांतील संस्थावासीयांची काळजी घेणे, त्यांना वागवून घेणे, त्यांचा चरितार्थ चालवणे, त्यांना प्रशिक्षण देणे, शिक्षण देणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांच्यात शिस्त राखणे ;

(आठ) अशा संस्थावासीयांना भेटणे व त्यांच्याशी संपर्क ठेवणे ;

(नऊ) सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत अडकवून ठेवण्याची शिक्षा झालेल्या स्त्रिया व मुली यांना अशा सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थांत पाठवण्याची व्यवस्था होईपर्यंत त्यांना तात्पुरते अडकवून ठेवणे ;

---

१. १९७८ चा अधिनियम ४६-कलम १८ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम १८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

(दहा) कलम २१, पोटकलम (१क) अन्वये एखाद्या संस्थावासी स्त्रीची,—

(क) एका सुरक्षागृहातून दुसऱ्या सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत ;

(ख) एका सुधारसंस्थेतून दुसऱ्या सुधारसंस्थेत किंवा सुरक्षागृहात

बदली करणे ;

(अकरा) जी स्त्री किंवा मुलगी निर्ढावलेली आहे अथवा सुरक्षागृहातील किंवा सुधारसंस्थेतील इतर संस्थावासीयांवर वाईट संस्कार घडवत आहे असे आढळून येईल अशा स्त्रीला किंवा मुलीला न्यायालयाच्या आदेशाला अनुसरून सुरक्षागृहातून किंवा सुधारसंस्थेतून कारागृहात हलवणे व अशा कारागृहात तिला डांबून ठेवण्याचा कालावधी ;

(बारा) कलम ७ किंवा कलम ८ खाली शिक्षा झालेल्या स्त्रियांना किंवा मुलींना सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत हलवणे व अशा सुरक्षागृहात किंवा सुधारसंस्थेत त्यांना अडकवून ठेवण्याचा कालावधी ;

(तेरा) सुरक्षागृहातून किंवा सुधारसंस्थेतून संस्थावासीयांची बिनशर्त किंवा सशर्त सुटका करणे व अशा शर्तींचा भंग झाल्यास त्यांना अटक करणे ;

(चौदा) अल्पावधीसाठी बाहेर राहण्यास परवानगी देणे ;

(पंधरा) जेथे स्त्रियांना व मुलींना ठेवता येईल, त्यांना अडकवून ठेवता येईल व त्यांचा सांभाळ करता येईल अशा सुरक्षागृहांची व सुधारसंस्थांची आणि अन्य संस्थांची तपासणी करणे ;]

(ज) विहित करावयाची किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) पोटकलम (२) च्या खंड (ध) किंवा (छ) अन्वये कोणतेही नियम करताना, राज्य शासनाला असा उपबंध करता येईल की, त्या नियमांचा भंग झाल्यास ते कृत्य दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(४) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येतील.

२४. 'सुधारशाळा अधिनियम, १८९७' (१८९७ चा ८) किंवा उक्त अधिनियमात फेरफार करण्यासाठी किंवा अन्यथा केलेला कोणताही राज्य अधिनियम यातील बाल गुन्हेगारांशी संबंधित अशा उपबंधांचे या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यूनीकरण होते असा तिचा अर्थ लावला जाणार नाही. हा अधिनियम इतर विवक्षित अधिनियमांना न्यूनकारी नसणे.

२५. (१) या अधिनियमाचे कलम १ खेरीज करून इतर उपबंध कोणत्याही राज्यात अंमलात येण्याच्या दिनांकी व तेव्हापासून, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी त्या राज्यात अंमलात असलेले, स्त्रिया व मुली यांच्या अपव्यापाराचे दमन करण्यासंबंधीचे किंवा वेश्याव्यवसायास प्रतिबंध करण्यासंबंधीचे सर्व राज्य अधिनियम निरसित ठरतील. निरसन व व्यावृत्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही राज्य अधिनियमाचे या अधिनियमाद्वारे निरसन करण्यात आले असले तरी, अशा राज्य अधिनियमाच्या उपबंधान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई (यात कोणताही निदेश देणे, कोणतीही नोंदवही, नियम किंवा आदेश करणे किंवा निर्बन्ध घालणे याचाही अंतर्भाव आहे) या अधिनियमाच्या उपबंधांशी जेथवर विसंगत नसेल तेथवर, तेव्हा अशी गोष्ट करण्यात आली किंवा कारवाई करण्यात आली तेव्हा जणू काही या अधिनियमाचे उपबंध अंमलात असावेत त्याप्रमाणे ती गोष्ट किंवा कारवाई उक्त उपबंधाखाली केली असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा केलेल्या कारवाईमुळे ती निष्प्रभावी होईपर्यंत अंमलात असल्याचे चालू राहील.

स्पष्टीकरण :—या कलमामधील 'राज्य अधिनियम' या संज्ञेत 'प्रांतिक अधिनियम' याचा समावेश आहे.

[1]अनुसूची

[कलम २(ग) पहा]

| कलम | शक्तींचा वापर करण्यास सक्षम असलेले दंडाधिकारी |
|---|---|
| ७(१) | जिल्हा दंडाधिकारी. |
| ११(४) | महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी. |
| १२(४) | महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी. |
| १५(५) | महानगर दंडाधिकारी, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी. |
| १६ | महानगर दंडाधिकारी, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी. |
| १८ | जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी. |
| १९ | महानगर दंडाधिकारी, प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उप-विभागीय दंडाधिकारी. |
| २० | जिल्हा दंडाधिकारी, उप-विभागीय दंडाधिकारी किंवा राज्य शासनाने विशेषेकरून शक्ती प्रदान केलेला कोणताही कार्यकारी दंडाधिकारी. |
| २२ख | महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी.] |

[1]१९७८ चा अधिनियम ४६, कलम १९ द्वारे घातले (२ ऑक्टोबर, १९७९ रोजी व तेव्हापासून).

# THE SUPPRESSION OF IMMORAL TRAFFIC IN WOMEN AND GIRLS ACT, 1956

## स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| advisory body | सल्लागार मंडळ | [S. 13-m.n.] |
| brothel | वेश्यागृह | [S. 2 (*a*)] |
| corrective institution | सुधारसंस्था | [S. 2 (*g*) (*ii*)] |
| habitual offenders | सराईत गुन्हेगार | [S. 12-m.n.] |
| immoral traffic | अपव्यापार | [Short title] |
| induce | प्रवृत्त करणे | [S. 5(1) (b)] |
| inmates (of protective homes) | (सुरक्षागृहांतील) संस्थावासी | [S. 23(2) (*g*) (vii)] |
| keeper of public place | सार्वजनिक ठिकाणाचा परिरक्षक | [S. 7(2)(*a*)] |
| landlord | भाडेमालक | [S. 3 (2) (*b*) ] |
| lessor | पट्टाकार | [S. 3 (2) (*b*) ] |
| maintain | चालवणे | [S. 21 (1) ] |
| on probation of good conduct | चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर परि-वीक्षाधीन ठेवून | [ S. 10 (2) ] |
| panel | पॅनेल | [ S. 17 (3) ] |
| police duties | सुव्यवस्था राखण्याची कामे | [ S. 2 (*i*) ] |
| procure | मिळवून देणे | [ S. 6 (*i*) (*a*) ] |
| promiscuous sexual intercourse | लैंगिक स्वैराचार | ( S. 2 (*e*) ] |
| prostitute | वेश्या | [ S. 2 (*e*) ] |
| prostitution | १. वेश्याव्यवसाय<br>२. वेश्याव्यवहार | [ S. 2 (*a*) ]<br>[ S. 7 (1) ] |
| protective home | सुरक्षागृह | [ S. 2 (*g*) ] |
| Provincial Act | प्रांतिक अधिनियम | [ S. 25-expl. ] |
| rescue | संकटमुक्त करणे | [ S. 2 (*g*) (*ii*) ] |
| search without warrant | वॉरंटाशिवाय झडती | [ S. 13-m.n.] |
| suppression of immoral traffic | अपव्यापारास आळा घालणे | [ Long title ] |
| take | घेऊन जाणे | [ S. 5(*c*) ] |
| validity | अंमल | [ S. 18 (3) ] |

## स्त्रिया व मुली अपव्यापार दमन अधिनियम, १९५६

## THE SUPPRESSION OF IMMORAL TRAFFIC IN WOMEN AND GIRLS ACT, 1956

### मराठी--इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपव्यापार | immoral traffic .. | [Short title] |
| अपव्यापारास आळा घालणे | suppression of immoral traffic | [Long title] |
| अंमल | validity .. | [S.18(3)] |
| घेऊन जाणे | take .. | [S. 5(*c*)] |
| चांगले वर्तन ठेवण्याच्या शर्तीवर परिवीक्षाधीन ठेवून | on probation of good conduct .. | [S. 10 (2)] |
| चालवणे | maintain .. | [S.21(1)] |
| पट्टाकार | lessor .. | [S.3(2)(*b*)] |
| पॅनेल | panel .. | [S. 17(3)] |
| प्रवृत्त करणे | induce .. | [S.5(1)(*b*)] |
| प्रांतिक अधिनियम | Provincial Act .. | [S.25-expl] |
| भाडेमालक | landlord .. .. | [S.3(2)(*b*)] |
| मिळवून देणे | procure .. | [S.5(1)(*a*)] |
| लैंगिक स्वैराचार | promiscuous sexual intercourse | [S.2(*c*)] |
| वेश्या | prostitute .. | [S.2(*e*)] |
| वेश्यागृह | brothel .. | [S.2(*a*)] |
| वेश्या व्यवसाय | prostitution .. | [S.2(*a*)] |
| वेश्याव्यवहार | prostitution .. | [S.7(1)] |
| वॉरंटाशिवाय झडती | search without warrant .. | [S.15-m.n.] |
| (सुरक्षागृहातील) संस्थावासी | inmates (of protective homes) | [S.23(2)(*g*)(*vii*)] |
| संकटमुक्त करणे | rescue .. | [S.2(*g*)(*ii*)] |
| सराईत गुन्हेगार | habitual offenders .. | [S.12-m.n.] |
| सल्लागार मंडळ | advisory body .. | [S.13-m.n.] |
| सार्वजनिक ठिकाणाचा परिरक्षक | keeper of public place .. | [S.7(2)(*a*)] |
| सुधार संस्था | corrective institution .. | [S.2(*g*)(*ii*)] |
| सुरक्षागृह | protective home .. | [S.2(*g*)] |
| सुव्यवस्था राखण्याची कामे | police duties .. | [S. 2(*i*)] |